वोकाट्राइब प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अमरावती ला हॉस्पिटलमध्ये कामासाठी मेगा भरती सुरू आहे

वार्ड बॉय -150 , जीएनएम नर्सिंग -100 , हाऊस कीपिंग-90 ही पदे भरती सुरू आहे.

संपर्क 07620610131 09623316598 08305146500

8 तास ड्युटी राहील

पगार 10,000-15000

संपर्काची वेळ सकाळी 10 ते संध्याकाळी 5 पर्यंत.


### रोड रॉबरीच्या गुन्ह्यात तीन विधी संघर्षीत बालक ताब्यात

**अमरावती** - गेल्या दोन दिवसात शहरात रोड रॉबरीच्या दोन घटना पुढे आल्या असून, या गुन्ह्यात गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तिन विधी संघर्षीत बालकांना ताब्यात घेतले आहे. गुरुवारी एका बालकाची प्रकृती बिघडल्याने, त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

# पालकमंत्र्यांच्या जनसंवाद कार्यक्रमात 700 च्यावर तक्रारी



## नागरिकांच्या लागल्या लांबलचक रांगा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) -** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नियोजन भवन येथील जनसंवाद कार्यक्रमात शुक्रवारी (दि.28) विविध क्षेत्रातील स्थानिक समस्याबाबत नागरिकांनी 700 च्या वर तक्रारी,निवेदने सादर केली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या विविध समस्या, त्यांचे म्हणणे ऐकून घेत त्यांचे समाधान केले.

पालकमंत्री यांना निवेदन देण्यासाठी नागरिकांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. पालकमंत्री यांनी तक्रारी, निवेदने आणि समस्या घेऊन आलेल्या नागरिकांशी व्यक्तीश: संवाद साधला त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्या तक्रारीवर येत्या आठ दिवसात कार्यवाही करण्यात येणार असून त्यासंबंधीची पोहोच पालकमंत्री कार्यालयातून येत्या आठ दिवसात देण्यात येणार आहे.वीज बिल, मालकी पट्टे, रस्ते, नोकरी, कृषी, शेतकरी आत्महत्या, घरकुल, रस्ते, पाणी, क्रीडा या विषयावर सुमारे चार तास पालकमंत्री बावनकुळे यांनी संवाद साधला.



### शेतापर्यंत पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न

शेतकरी आत्महत्येचा प्रश्न जिल्ह्यात आणि संपूर्ण विभागात गंभीर आहे. विभागातील शेतकऱ्यांसमोर पाण्याची उपलब्धता हे मोठे आव्हान आहे. सरकार या विषयावर गांभीर्याने विचारमंथन करत आहे. शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचण्यापासून पाण्याचे स्रोत शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचले तरच त्यांना चांगले पीक मिळेल. मग शेतकऱ्यांची मुलेही शेतीत कामाला जातील. शेतात सिंचनाचे काम पूर्ण झाल्यावर शेतकरी आत्महत्या थांबतील. येत्या काळात या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार प्रयत्न करेल, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

### उद्धव ठाकरे औरंगजेब फॅन क्लबचे अध्यक्ष होतील

उद्धव ठाकरे यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदूत्व पायदळी तुडवले. ज्या दिवशी मला काँग्रेससोबत जावे लागेल, त्या दिवशी मी माझे शिवसेनेचे दुकान बंद करेन, असे बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते. मात्र, उद्धव ठाकरेंनी स्वत- बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले. मतांच्या लांगुनचालनासाठी उद्धव ठाकरेंनी धर्म सोडला, हिंदुत्वाचा विचार सोडला. भगव्या ध्वजाचा विचार सोडला. उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे सदस्य झाले आहेत, पुढच्या काळात ते अध्यक्षही होतील, अशी टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केली.

### संजय राऊतांना महाराष्ट्राने ऐकणे सोडले

बावनकुळे म्हणाले, शिवसेनेचे नेते संजय राऊत यांना महाराष्ट्रातील जनतेने ऐकणे सोडले आहे. मला त्यांचे बोलणे ऐकू येत नाही, त्यामुळे त्यांच्याविषयी बोलून काहीच फायदा नाही. दिशा सालियन प्रकरणाचा अंतिम अहवाल येऊ द्यावा, आज या विषयावर मत प्रदर्शित करणे हे घाईचे होईल, असे मला वाटते. दिशा सालियनच्या वडिलांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती, ते उच्च न्यायालयात गेले आहेत. जोपर्यंत पोलीस अंतिम निष्कर्षापर्यंत पोहचत नाही, तोवर माझ्या सारख्या व्यक्तीने बोलून तपासात यंत्रणेत अडथळा आणणे योग्य होणार नाही,असेही बावनकुळे म्हणाले.

### मुलभूत सोई सुविधांना प्राधान्य

जिल्ह्यात रस्ते, चांगल्या आरोग्य सुविधा, शिक्षण, पाणीपुरवठा, शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचविणे या मूलभूत सुविधा पुरविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सर्व लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडून नियमित आढावा घेण्यात येणार आहे, यासह अमरावती-परतवाडा असा 100 किमी हायवे करण्याचा प्रस्ताव देखील मान्य करण्यात आला आहे,असेही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगीतले. जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी आमदार प्रताप अडसड, प्रवीण तायडे, प्रवीण पोटे, केवलराम काळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार,जिप सीईओ संजिता महापात्र महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे आदी उपस्थित होते. बावनकुळे पुढे म्हणाले की, सरकारी शाळांमध्ये सर्वसामान्यांच्या मुलांना आधुनिक तंत्रज्ञानासोबत दर्जेदार शिक्षण देण्यासाठी जो काही निधी लागेल तो प्रशासन देईल. जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळांचे आधुनिकीकरण करून सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षण घेता येईल. त्यामुळे शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढवणे गरजेचे आहे. संपूर्ण जिल्हा टीबी रोगमुक्त करण्याचे उद्दीष्ट असल्याचे देखील त्यांनी सांगीतले.

# जिल्हा वकील संघाच्या कार्यकारीणीसाठी आज मतदान



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.28 ) -** जिल्हा वकील संघाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व 7 सदस्य पदाकरिता उद्या शनिवारी (दि.29 मार्च) रोजी निवडणूक होणार आहे. गेल्या महिन्याभरापासून अमरावती जिल्हा वकील संघाच्या 2025-2026 च्या कार्यकारीणीसाठी होणाऱ्या निवडणुकीत इच्छुक उमेदवार वकील मतदार सदस्यांसोबत संपर्क-संवादातून तसेच भेटीगाठीतून आपले अमूल्य मतदान आम्हालाच करण्यात यावे, अशी आग्रही भूमिका पार पाडतांना दिसून आले.

शनिवारी होऊ घातलेल्या या निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी ॲड.सुनील देशमुख व ॲड. हरीश निंबाळकर यांच्यात लढत होणार आहे. तर उपाध्यक्ष पदाकरिता ॲड.विनोद दशस्त्र व ॲड.आशिष लांडे यांच्यात मुकाबला होणार आहे. यासोबतच सचिव पदासाठी ॲड.अमोल मुरळ व ॲड.नासिर शाह तसेच ॲड.सीमा तोंडरे यांच्या लढत होणार आहे. तर ग्रंथालय सचिवच्या पदासाठी ॲड.विद्या मानके(काळे) व ॲड.सचिन पंडितकर हे उमेदवार रिंगणात आहे. नैसर्गिक तापमानाचा वाढता पारा किंवा या निवडणुकीत इच्छुक उमेदवारांचा प्रचाराचा वाढता जनसंपर्क लक्षात घेता, वकील मतदार सदस्यांचा कल नेमका कोणाकडे राहणार आहे. हे मात्र, सध्या न उलगडणारे कोडे आहे. या निवडणुकीत मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ॲड.आर.बी.कलंत्री आपल्या जवाबदारीचे वहन करीत आहे. तर ॲड.शहजाद नय्यर हे उप-निवडणूक अधिकारी म्हणून कामकाज पाहत आहे. यासोबतच एक्झुकेटीव्ह मेम्बर या पदासाठी एकूण 7 जागेसाठी 13 उमेदवार उभे ठाकले आहे. यामध्ये ॲड.अक्षय बोळे, ॲड.प्रेम दामोदर, ॲड.राजू जामनेकर, ॲड.नेतल मल्ल, ॲड. गजानन मनोहरे, ॲड. चंद्रमोहन मिसाळ, ॲड. आशिषसिंग परिहार, ॲड. अफरोज खान पठाण, ॲड. पूनम रिठे, ॲड.सुमित शर्मा, ॲड .विशाखा तागडे (पाटील), ॲड. ऋषिकेश उपाध्ये हे सर्व उमेदवार आपली उमेदवारी दाखल केली आहे. वकील मतदार सदस्य बांधव व भगिनींसोबत चर्चा, विनिमय, संवाद, संपर्क, थेटभेट या पंचसूत्रीचा अवलंब करून प्रचारात व्यस्त राहत आम्हाला संधी द्यावी, अशी विनंती करत आहे. रंगतदार होणाऱ्या लढतीत नेमके कोण बाजी मारणार? याचे अंदाज-आडाखे आतापासूनच बांधल्या जात आहे. आता मात्र यावर्षी होणाऱ्या निवडणुकीत नेमके कोणाचे पारडे जड राहणार, हे मात्र आताच सांगणे कठीण आहे. अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून कामकाज सांभाळणारे ॲड.आर.बी.कलंत्री यांनी प्रतिक्रिया देताना निवडणूक कार्यक्रम व अंमलबजावणी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना संदर्भात विस्तृतपणे माहिती दिली.

### आईच्या अंगावर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न

**मोर्शी** - आईच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला जाळून टाकण्याचा प्रकार शुक्रवारी (दि.28) सकाळी 7.30 वाजता उघडकीस आला. यामध्ये सदर महिला 75 टक्के जळाली. पोलिस सूत्राकडून प्राप्त माहितीनुसार विनोदराव लंगडे रा.यशवंत नगर मोर्शी यांची विवाहित मुलगी दिपाली ही काही महिन्यापासून आपले वडील विनोद लंगडे यांच्या घरी राहत होती. त्या ठिकाणी दिपालीचे वडील विनोद लंगडे,आई संगीता लंगडे,लहान बहीण राहत होती. शुक्रवारी(दि. 28) दिपाली प्रतीक पाचघरे वय (33)वर्ष हिने आपली आई संगीता ही झोपेतून उठून बसली असतांना अंगावर पेट्रोल टाकून तिला जिवंत मारून टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

# हत्या प्रकरणातील आरोपीला जन्मठेप

## 2022 मधील नागपुरी गेट हद्दीतील प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) =** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुलिस्तानगर येथे 8 मे 2022 रोजी घडलेल्या फिरोज खान अफसर खान याच्या हत्येप्रकरणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. यार्लगड्डा यांच्या न्यायालयाने एका आरोपीला 28 मार्च रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मोहम्मद शाकीर खान जाकीर खान असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

शेख मुन्नफजर शेख बहार रा. गुलिस्तानगर यांच्या तक्रारीवरून 8 मे 2022 रोजी नागपुरी गेट पोलिसांनी मोहम्मद शाकीर खान व सोहेल खान या दोघांविरुद्ध एकाची हत्या तर दुसऱ्याच्या हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. घटनेच्या दिवशी शेख जफीर हा आईला दुचाकीवर बसवून दवाखान्यात घेऊन जात होता.

त्यावेळी मोहम्मद शाकीर खान व सोहेल खान यांनी त्यांची दुचाकी रस्त्यावर उभी केली होती. त्यामुळे शेख जफीर याने शाकीर खान याला रस्त्यातून दुचाकी हटविण्याची विनंती केली. त्यावेळी शाकीर खान याने शेख जफीरला धमकी दिली होती. परिसरात सुरू असलेल्या या वादाबाबत माहिती मिळताच शेख जफीरचा नातेवाइक फिरोज खान अफसर खान व शेख मुन्नफजर हे दोघे त्यांना समजाविण्यासाठी एका धार्मिकस्थळी गेले. धार्मिकस्थळावरून बाहेर पडल्यावर मोहम्मद शाकीर खान याने मुन्नफजरवर चाकूने वार केला. तो वार चुकवून तो तेथून पळाला. त्याच्याच मागे फिरोज खान अफसर खान होता.

शाकीर खान याने पाठलाग करून फिरोज खानवर चाकूने सपासप वार केले. त्यात फिरोज खान याचा मृत्यू झाला. या प्रकरणी मोहम्मद शाकीर खान व सोहेल खान या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले. या प्रकरणात न्यायालयात 15 साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजही न्यायालयासमोर सादर करण्यात आले. या प्रकरणात सोहेल खान याची सबळ पुराव्याअभावी याची निर्दोष सुटका करण्यात आली. तर दुसरा आरोपी मोहम्मद शाकीर खान जाकीर खान याला फिरोज खान अफसर खान याची हत्या व शेख मुन्नफजर शेख बहार याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता दिलीप तिवारी यांनी यशस्वी युक्तीवाद केला.

# परतवाड्यात 1 लाख रुपयांचा गांजा जप्त

## विक्री करणाऱ्या आरोपीस अटक



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.28 ) -** जिल्हा ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने परतवाडा येथे मुगलाईपुरा भागात छापा मारुन अवैधरीत्या गांजाची विक्री करित असलेल्या एका इसमास अटक केली. त्याच्याकडून 1 लाख 4 हजार रुपये किंमतीचा गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. इकबाल खान महेबूब खान (36, रा. मुगलाईपुरा, परतवाडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

परतवाडा शहरातील मुगलाईपुरा परिसरात असलेल्या क्रीडा संकुलानजीक इकबाल खान महबूब खान हा गांजाची विक्री करित असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यावरुन गुन्हे शाखेने सापळा रचला आणि मुगलाईपुरा येथे छापा मारला. इकबाल खान याला गांजाची विक्री करताना रंगेहात अटक करण्यात आली. त्याच्याकडून पोलिसांनी 650 ग्राम एवढा गांजा जप्त केला. त्याची किंमत 1 लाख 4 हजार रुपये एवढी असल्याचे सांगण्यात आले. आरोपीच्या ताब्यातून एक मोटरसायकल (एमएच 30 / टी 5029) देखील पोलिसांनी हस्तगत केली आहे.

अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद, उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षण किरण वानखडे, परतवाडा ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्या नेतृत्वात सचिन पवार, युवराज मानमोठे, रविंद्र वन्हाडे, स्वप्नील तंवर, सांगर नाठे, शांताराम सोनोने, सुरेश पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# ते चटके दिलेले बालक झाले स्वस्थ

## आठ लाख रुपये खर्च करुन हृदयावर शस्त्रक्रिया ■ पालकमंत्र्यांच्या विशेष प्रयत्नातून झाले उपचार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.28 )-** चिखलदरा तालुक्यातील सिमोरी या गावातील 22 दिवसांच्या बाळाला निमोनिया झाल्याने त्यावर घरगुती उपाय म्हणून लोखंडी गरम विळ्याने बाळाच्या पोटाला 65 वेळा चटके देण्याचा अघोरी प्रकार झाल्याचे समोर आले आहे. या अत्यवस्थ झालेल्या बाळावर जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) मध्ये उपचार सुरु असताना त्याला हृदयाचा गंभीर आजार असल्याचे समोर आले होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष प्रयत्नातून या बाळाच्या हृदयरोगावर नागपूरला उपचार करण्यात आले. आता हे बाळ स्वस्थ असल्याची माहिती पालकमंत्र्यांनी शुक्रवारी एका पत्रकार परिषदेत दिली.



अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दि. 3 फेब्रुवारी रोजी फूलमती राजू दहिकर, (वय 22 वर्ष, रा. सिमोरी) यांची प्रसूती होवून मुलगा झाला. बाळाचे वजन 3.4 किलो होते. माता व बाळाची प्रकृती चांगली असल्याने त्यांना रुग्णालयातून दि. 6 फेब्रुवारी रोजी सु ?ट्टी देण्यात आली. दरम्यान दि. 6 ते 22 फेब्रुवारी पर्यंत आरोग्य कर्मचारी आणि आशा यांच्याकडून गृहभेटी देण्यात आल्या. तसेच दि. 18 फेब्रुवारी रोजी रात्री बाळाला आजीने डम्बा(चटके) दिले. ही बाब 23 फेब्रुवारी रोजी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आली. याबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांनी बाळाला रुग्णालयात नेण्याची सांगितले असता पालकांनी नकार दिला. त्यानंतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे बाळाला हतरु प्राथमिक आरोग्य केंद्रात दि. 24 फेब्रुवारी रोजी तपासणी केल्यानंतर चुरणी ग्रामीण रुग्णालय येथे संदर्भीत करण्यात आले. तेथून अचलपूर उपजिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करण्यात आले. त्यानंतर रात्री 11.30 वाजता अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात स्पेशल न्यू वॉर्न केजर यूनीट (विशेष नवजात शिशु देखभाल) मध्ये भरती करण्यात आले. बाळाची तपासणी केली असता त्याला जन्मजात हृदयरोग असल्याने बाळाचे ऑपरेशन करणे आवश्यक असल्याचे निदान झाले. त्यानुसार बालकाला नागपूर येथील नेल्सन रुग्णालयात जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांनी शासकीय निधीतून बाळाला नागपूरला पाठविले होते. यावेळी पोलिस प्रशासनाने ग्रीन कॉरिडॉर बनवून बाळाला नागपूरला नेले होते.


**मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड**
motilal oswal Home Finance
कॉर्पोरेट ऑफिस: मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई-४०००२५
ईमेल:-hfquery@motilaloaswal.com. CIN Number:- U65923MH2013PLC248741

**ताबा सूचना (जंगम मालमत्ता/आयईएससाठी)**
(सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (१) अंतर्गत)

तर खाली स्वाक्षरी केलेले मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, (औपचारिकपणे अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाते), फायनान्शियल सेल्सचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ (२००२ पैकी ५४) अंतर्गत आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून डिमांड नोटीस जारी केली कि खालील कर्जदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येथे नमूद केलेल्या सूचनेत नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन करत आहे.

खालील कर्जदारांनी रक्कम परतफेड केली नाही, याद्वारे खालील कर्जदारांना नोटीस देण्यात आली आहे आणि सर्वसाधारणपणे खाली स्वाक्षरी केलेल्या जनतेने येथे नमूद केलेल्या तारखेला सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | कर्ज करार क्रमांक / कर्जदार/ सह-कर्जदार/जामीनदारांचे नाव | मागणी सूचना आणि थकबाकीची तारीख | ताब्यात घेतल्याची तारीख | स्थावर मालमत्तेचे वर्णन ते सर्व भाग आणि मालमत्तेचे पार्सल |
|---|---|---|---|---|
| 1 | LXAMR00516-170044440/ LXMOHOF220-210551470 कर्जदार: जगदीश विठ्ठलराव भाटकर, सह-कर्जदार: विठ्ठल मोतीरमजी भाटकर | १०-१२-२०२० साठी रु. १४६८३४३/- | 26-03-2025 | प्लॉट नं.-६०३, (भाग) शीट क्रमांक - ३, श्री राम चौक प्रभाग क्रमांक २, वलगाव, प्रगणे-बडनेरा, अमरावती, महाराष्ट्र - ४४४८०१ |
| 2 | LXAMR00216-170043417 कर्जदार: गजानन रामराव लोणारे सह-कर्जदार: रामराव परशराम लोणारे | ०८-०५-२०२२ साठी रु. ७९५८७९/- | 27-03-2025 | मालमत्ता क्रमांक १८२५, अनु क्रमांक १८२५, ग्रामपंचायत नांदगाव पेठ, तालुका अमरावती, जिल्हा अमरावती, महाराष्ट्र ४४४९०१ |

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेचा व्यवहार न करण्याची खबरदारी देण्यात आली आहे आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडच्या शुल्काच्या आणि त्यावरील व्याजा च्या अधीन असेल .

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

ठिकाण: महाराष्ट्र
दिनांक २९.०३.२०२५

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी
मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कापसाचा भाव 300 रुपयांनी वाढला

## सरकीच्या दरवाढीचा परिणाम



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.28 )**– स्थानिक बाजारात मागणी वाढल्याने सरकीच्या दरात क्विंटलमागे 200 ते 300 रुपयांनी दरवाढ झालेली आहे. त्यामुळे कापसाचेही दर 7250 ते 7500 रुपयांवर पोहोचले आहेत.

सध्या 15 ते 20 टक्के शेतकऱ्यांनी दरवाढीच्या प्रतीक्षेत कापसाची साठवणूक केलेली आहे. सीसीआयद्वारा कापसाची खरेदी 24 मार्चपासून बंद करण्यात आली. ग्रेड कमी केल्याने सीसीआयचे दर हमीभावापेक्षा 7421 रुपये होते. यामध्ये सरकीचे दर पूर्वी 3300 रुपये क्विंटल होते ते 26 मार्चला 3750 रुपये क्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. उन्हाळ्यात सरकीच्या दरात काही प्रमाणात वाढ दरवर्षी होते. सोबत आंतरराष्ट्रीय घडामोडीचाही फरक दरावर झाला आहे. त्यामुळे स्थानिक बाजारात कापसाची काही प्रमाणात दरवाढ झाली असली तरी पुन्हा दरवाढ होईल किंवा हेच दर कायम राहतील, याची शाश्वती नसल्याची माहिती व्यापा–यांनी दिली. गतवर्षी सरासरीपेक्षा जास्त पावसाने कपाशीचे मोठे नुकसान झाले.

### गाठीचा दर 5150 रुपयांवर

सरकीच्या दरात वाढ झालेली असली तरी रुईच्या दरात अद्याप वाढ झालेली नाही. सद्य:स्थितीत रुईचे दर 65 सेंट पर पाऊंड आहे. तर गठाणचे दर ( 170 किलो ) 5170 रुपयांवर आहे. रुपयाच्या तुलनेत डॉलरची दरवाढ, चीनच्या गारमेंट उत्पादनावर अमेरिकेने वाढविलेला टेरिफ यासह अन्य बाबींमुळे देशांतर्गत कापसाचे दर टिकून असल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले.

# महिला रोजगार मेळाव्यात 168 उमेदवारांची प्राथमिक निवड

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय येथे गुरुवारी (दि.27) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ‘पंडित दीनदयाल उपाध्याय महिला रोजगार मेळावा’ आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यामध्ये 280 जागेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाईन असे एकूण 470 महिला उमेदवारांनी नोंदणी केली. तर प्रत्यक्ष 310 उमेदवारांनी मुलाखती दिल्या. त्यामध्ये एकूण 168 उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.



मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मानकर, कौशल्य विकास विभागीय कार्यालयाचे उपायुक्त दत्तात्रय ठाकरे, सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर आदी यावेळी उपस्थित होते. महानगरातील कंपन्यांनी रोजगार मेळाव्यास उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देणे हे आजच्या स्पर्धेच्या युगात जमेची बाब आहे. तसेच कोणत्याही यशाला शॉर्टकट नसतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार लागू झालेल्या अभ्यासक्रमाने विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख व उद्योगाभिमुख बनविण्याचे कौशल्य विकास विभागाचे प्रयत्न आहेत. विद्यार्थ्यांनी मेहनत घ्यावी आणि उपलब्ध रोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले.

यावेळी उपस्थित उद्योजकांचामान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मास्को प्रिसिजन लिमिटेड, वोडाफोन आयडिया लिमिटेड, टाटा ग्रीन बॅटरी प्रा. लि., क्रेडीट ॲक्सेस ग्रामीण लि.,उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक, सुझलॉन एनर्जी, गिरनार गिअर्स प्रा. लि., बजाज अलायन्स प्रा. लि., टाटा स्ट्राईव्ह प्रा. लि. यासह एकुण 14 कंपन्यानी उपस्थित विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अल्पावधीतच नियुक्ती पत्र प्रदान केल्या जाणार आहे. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. अर्चना आलेगावकर यांनी तर आभार कौशल्य विकास अधिकारी पवार यांनी मानले. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षेकतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्ह्यात महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 28 )** – जिल्ह्यात महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे 27 मार्च रोजी उघडकीस आले आहे. चांदुररेल्वे व चांदुरबाजार तालुक्यात या घटना घडल्या असून, या घटनांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

चांदुररेल्वे तालुक्यात मनोरुग्ण तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना 27 मार्च रोजी उघडकीस आली. या घटनेची तक्रार 40 वर्षीय महिलेने 27 मार्च रोजी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. तक्रारीनुसार, मनोरुग्ण तरुणी घरात झोपली होती. दरम्यान तिच्या आईला जाग आल्यानंतर ती घरात दिसली नाही. त्यामुळे त्यांनी मुलीचा शोध घेतला. त्यावेळी आरोपी तरुण हा मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न करताना दिसला. या घटनेची तक्रार महिलेने चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली.

त्यानुसार पोलिसांनी आरोपी वासुदेव रामजी राठोड (36, रा. चांदुररेल्वे) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. तसेच चांदुरबाजार तालुक्यात घराशेजारी राहणारी एक तरुण शेजारी राहणार्या व्यक्तीच्या घरी मोबाईल चार्जिंगकरिता गेली होती. दरम्यान आरोपी अनाडी जुगर राठी (40) याने तरुणीला जबरदस्तीने पकडून तिचे तोंड दाबले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

त्यामुळे ती तरुणी गर्भवती राहिली. ही घटना तरुणीला अमरावती येथील रुग्णालयात दाखल केल्यानंतर उघडकीस आली. याप्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी झिरो डायरी कायमी केली असून, हे प्रकरण चांदुबाजार पोलिसांकडे वर्ग केले आहे.

# आरुषी निमावत चे नवोदय परीक्षेत सुयश

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.28 )** – तळेगाव ठाकूर येथील आरुषी निमावत हिने नवोदय परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळेची इयत्ता पाचवी विद्यार्थीनी असून तिच्या या यशाबद्दल तिचा शाळेत (दि.26) सत्कार करण्यात आला. आरुषी ने दाखवून दिले की जिल्हा परिषद शाळेत असूनही यश संपादन करता येऊ शकते. आरुषी हिने नवोदय विद्यालय प्रवेश प्रकियेत घवघवीत यश मिळवून गावाच्या सन्मानात यशाचा तुरा रोवला. यासाठी आरुषीचे तळेगाव नगरीतील पालक,शाळा व्यवस्थापन समिती व संपूर्ण शिक्षकवर्गातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.ती आपल्या यशाचे श्रेय मुख्याधिपीका कावळे, वर्गशिक्षिका सुचिता ढाले तसेच निलेश कांडलकर,नवनीत निशाण,गणेश वाढवे, संगीता गाडगे, ज्ञानेश्वर माळोदे व सरिता टाकरखेडे यांना देते.



## 3 एप्रिल ला होणार भाषा विज्ञानची फेरपरीक्षा

**अमरावती** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी – 2024 एम.ए. (संस्कृत) सेमि.–1 (एन्.ई.पी.) व्याकरण ही भाषाविज्ञान विद्यार्थ्यांची केंद्र क्र. 103 वरील फेरपरीक्षा विद्यापीठ प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार त्याच केंद्रावर दि. 3 एप्रिल रोजी दुपारी 2 ते 5 या वेळेत घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे.

# आरडीआयके व केडी महाविद्यालयात पालक सभा



**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा,( दि.28 )** – बडनेरा येथील युथ वेलफेअर सोसायटीद्वारा संचालित बॅरि. आरडीआयके व केडी महाविद्यालयात अकरावी व बारावी वर्गासाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. देशमुख होते. यावेळी पालक समिती सदस्य सौ. साखरकर, सौ. सपाटे यांनी आपले विचार व्यक्त केले. प्राचार्यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणार्या शैक्षणिक सुविधांबद्दलची व विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम राबवितात त्याची माहिती पालकांना दिली. प्रास्ताविक प्रा. गौरव काकडे, कार्यक्रमाचे संचालन प्रा. मळसणे व आभार प्रदर्शन प्रा. भारती ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी व शिक्षकेतर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धामध्ये अमरावती प्रथम

## प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी केले विद्यार्थ्यांचे अभिनंदन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – दिव्यांग कल्याण विभाग, दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांचे तर्फे आयोजित दिव्यांग मुला–मुलींच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा 2025 मध्ये अमरावती जिल्ह्याने अंध मूकबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद, व बहु विकलांग अशा पाच प्रवर्गाच्या जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक (दि.25) पटकाविला. विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रामधून नागपूर येथील राज्यस्तरीय स्पर्धेकरिता सहभागी झाले होते. यामध्ये विभागातील अमरावती जिल्ह्याच्या अंधप्रवर्गातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाची चॅम्पियन ट्रॉफी मिळवली व मूकबधिर प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांकाची चॅम्पियन ट्रॉफी मिळवून राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धांमध्ये अमरावती जिल्ह्याला नावलौकिक मिळवून दिला. यामध्ये विशेष उल्लेखनीय म्हणजे सन 2014 पासून सातत्याने प्रथम पारितोषिकाची परंपरा कायम राखत यावर्षीही अंधप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाची चॅम्पियन ट्रॉफी यावर्षीही जिंकून आणली. या स्पर्धेमध्ये डॉ. भिवापूरकर अंध विद्यालय, आश्रित अंध कर्मशाळा अमरावती, निवासी अंध विद्यालय चिखलदरा व स्वामी विवेकानंद अंध विद्यालय परतवाडा येथील विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. द्वितीय चॅम्पियनशिप करिता नूतन मूकबधिर विद्यालय अमरावती, बुलिदान राठी मूकबधिर विद्यालय अमरावती, निवासी मूकबधिर विद्यालय टोंगलापुर फाटा मासोद ता. चांदूरबाजार चे विद्यार्थी सहभागी झाले होते. यासोबतच विद्यार्थ्यांनी गोळा फेक, धावणे, पोहणे, बुद्धिबळ लांब उडी इत्यादी विविध क्रीडा प्रकारांमध्येही पदक तालिकेत अमरावती जिल्ह्या चे वर्चस्व टिकवून ठेवले.

या क्रीडा स्पर्धामध्ये भरघोस यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी व सर्व टीमचे प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. भविष्यात यशाची परंपरा कायम राखण्यासाठी शुभेच्छा दिल्यात. यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी डी. एम. पुंड, मुख्याध्यापक अरविंद राऊत, डॉ . नरेंद्र भिवापुरकर अंध विद्यालय व्यवस्थापकीय अधीक्षक पंकज मुदगल, जितेंद्र ढोले , महेंद्र शिंदे,उमेश धुमाळ, आशिष चुनडे, चंद्रशेखर मोहोड यांच्यासह दिव्यांग संस्थांचे शिक्षक व इतर शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 10 विद्यार्थ्यांची कॉग्निजंट कंपनीव्दारे निवड जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 28 )** – सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या कंप्युटर सायन्स इंजिनिअरींगमधील दहा विद्यार्थ्यांची कॉग्निजंट कंपनीद्वारे निवड करण्यात आल्याचे जाहिर करण्यात आले आहे.

यामध्ये ईशा काटे, कल्याणी भोकरदनक, श्रेया गोंडाने, स्वानंदी आंबेकर, ओम दशपुते, हार्दिक रायचूरा, अनय पुंड, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागाचे प्रणय पोहेकर, संस्कृती राणे, इलेकट्रोनिक्स एन्ड टेलिकम्युनिकेशन विभागाची सलोनी अडसड यांचा समावेश आहे. कॉग्निजंट निवड प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानासोबत संवाद कौशल आणि समस्या सोडविण्याच्या समतेची चाचणी घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी या सर्व कसोट्यावर उत्कृष्ट प्रदर्शन करीत भरगोस यश मिळविले. संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता, प्राचार्य डॉ. संजय खेरडे सरांच्या प्रेरणेतून विभागप्रमुख डॉ. अजय ठाकरे, डॉ. विजय गुल्हाने, डॉ. विजया शांडिल्य, इंडस्ट्री इंस्टिट्यूट इंटरॅक्शन आणि कार्पोरेट रिलेशन विभागाचे डॉ. पवन देशमुख, डॉ. निकिता गुप्ता, प्रा. नितीन शेलोकर प्रा. गणेश गोविंदवार, डॉ. सागर टवानी, प्रा. शशांक बोन्डे, डॉ. जयकुमार कर्णेवार, प्रा. प्रियंका नंदागवळी, प्रा. ऋजुजा देशमुख, प्रा. अपुर्वा भुयार ह्यांनी विद्यार्थ्यांचे योग्य मार्गदर्शन करीत यश संपादन केले.

## पीडीएमसीत प्रसुती पूर्णतः नि:शुल्क




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )**– डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (पीडीएमसी), अमरावती येथे जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील प्रसूतीसाठी येणाऱ्या सर्व गरोदर मातांची प्रसुती, महाविद्यालय प्रशासनाच्या पुढील आदेशापर्यंत पूर्णतः नि:शुल्क करण्यात येत आहे. तसेच नवजात शिशूला ऐकू येण्याविषयी कानाची चाचणी सुध्दा निःशुल्क करण्यात येईल. तरी या संधीचा जास्तीत जास्त गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे तसेच स्त्रीरोगशास्त्र विभागप्रमुख डॉ. पुष्पा जुनघरे यांनी केले आहे.

# मेळघाटात शिवसेना उबाठाचे संघटन वाढविणार

## कार्यकर्त्यांच्या बैठकीत निर्धार ▮ स्थानिक समस्यांवर चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी( दि.28 )** – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक चिखलदरा येथे शासकिय विश्राम गृहात नूकतीच पार पडली. मेळघाटात पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार या बैठकीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केला.



जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे व निवासी उपजिल्हाप्रमुख मुन्ना शर्मा यांच्या उपस्थितीत ही बैठक घेण्यात आली. यावेळी तालुका प्रमुख, शहर प्रमुख यांच्यासह विभाग प्रमुख, उप शहर प्रमुख, उपतालुका प्रमुख, उपविभाग प्रमुख, आजी–माजी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मेळघाटातील स्थानिक समस्यांवर सविस्तर चर्चा करुन त्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याचे ठरविण्यात आले. प्रामुख्याने उपजिल्हा रुग्णालय चिखलदरा येथे अनेक समस्या असल्याचा पाढाच कार्यकर्त्यांनी वाचला. जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे यांनी बैठक संपताच सर्व पदाधिकार्यां सह ग्रामीण रुग्णालय गाठले. तेथे अनेक असुविधा आढळून आल्यात. प्रभारी म्हणून अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालय येथील डॉक्टर कारभार पाहतात. तेही महिण्यात एकदाच येथे येत असल्याचे समजले.

चिखलदरा शहरात आठवड्यात एक दिवसाआड पाणी पुरवठा होतो, तोही टँकरद्वारे केल्या जातो. उपजिल्हा रुग्णालय येथे सुद्धा आठवड्यात एकदा टॉकरने पाणी पुरवठा केला जातो. सदर रुग्णालय येथे रिक्त पदांची संख्या जास्त आहे. राज्याचे आरोग्यमंत्री चिखलदरा येथे आले होते. परंतु ते ग्रामीण रुग्णालयात गेलेच नाही. ही चिखलदरा वासियांसाठी शोकांतिका आहे, अशी टीका शिवसेना उबाठाने केली आहे. चिखलदरा शहराला पाणीपुरवठा आठ दिवसात एक वेळ होतो. तोही गडुळ पाण्याचा. चिखलदरा शहराला स्वच्छ पाणी पुरवठा व उपजिल्हा रुग्णालय येथे त्वरित रिक्त जागा न भरल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे, उपजिल्हा प्रमुख मुन्ना शर्मा, तालुका प्रमुख टिल्लू तिवारी, शहर प्रमुख इंब्बु शहा, उपशहर प्रमुख सागर चौधरी, उपतालुका प्रमुख शिवराज मोरले, साहेबराव वाघमारे, अविनाश पिपरदे, अमोल होते, राजेश मावस्कर, विल्सन डॅनियल, किसना शनवारे, बलदेव हेकडे, राजेश येवले, भरत मुंडे, शंकर खडके उपस्थित होते.

# पवित्र शब-ए-कद्र निमित्त अचलपुरात अखेरपर्यंत इबादत

## मुस्लिम बांधवांचा सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर, ( दि.28 )**– रमजानच्या शेवटच्या अशर्यातील सर्वात पवित्र आणि बरकतोंनी भरलेली रात शब–ए–कद्र अचलपुर शहरात संपूर्ण श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. गुरुवारी रात्री मुस्लिम समाजातील नागरिकांनी मस्जिद आणि घरी जागरण करत कुरआन पठण, नफील नमाज आणि तस्बीह वाचण्यात वेळ घालवला. या रात्री मुस्लिम बांधवांनी अल्लाहकडे आपल्या चुका माफ करण्यासाठी आणि बरकत मिळवण्यासाठी प्रार्थना केली.

अचलपुरातील विविध मस्जिदांमध्ये या रात्री कुरआन मुकम्मल करण्यात आले. यानिमित्त हाफिजांना इनाम (नजराणा) देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. धर्मगुरूंनी शब–ए–कद्रच्या महत्त्वावर व्याख्यान देत ही रात्र हजार महिन्यांपेक्षा अधिक फजिलतदार असल्याचे सांगितले. यावेळी मौलाना आणि हाफिज हजरत यांनी अल्लाहकडे तौबा (पश्चाताप) करणार्यांचे सर्व गुनाह माफ होतात, असे सांगत समाजाला सत्य आणि चांगुलपणाच्या मार्गावर चालण्याचा सल्ला दिला. या शुभ रात्री अचलपुरातील मुस्लिम समाजाने देशात आणि जगात अमन–शांती आणि सौहार्दासाठी विशेष दुआ केली. मृत आत्म्यांसाठी माफी मिळावी यासाठीही प्रार्थना करण्यात आली.

### मशिदींची आकर्षक सजावट

अचलपुरातील सुप्रसिद्ध दरगाह अब्दुल रहमान गाझी येथेही मोठ्या संख्येने भाविकांनी हजेरी लावली. येथे अखेरपर्यंत इबादत, तवाफ (दरगाह भोवती इबादत) आणि प्रार्थनांचे आयोजन करण्यात आले होते. शब–ए–कद्रच्या निमित्ताने अचलपुरातील सर्व मस्जिदांना आकर्षक रोषणाई करण्यात आली. झगमगाट करणार्या मस्जिदांनी शहरात रमजानच्या पाकीजगीची अनुभूती दिली. हजार महिन्यांपेक्षा अधिक फजिलतदार रात्र इस्लाममध्ये ही रात्र 83 वर्षांच्या इबादतीपेक्षा अधिक सवाब देणारी मानली जाते. या रात्री कुरआनचे अवतरण कुरआन या रात्री अवतरले, त्यामुळे ही रात्र विशेष मानली जाते. हदीसानुसार, या रात्री फरिश्ते पृथ्वीवर येतात आणि अल्लाह त्याच्या भक्तांच्या प्रार्थना स्वीकारतो. जो कोणी मनापासून तौबा करतो, त्याचे सर्व गुनाह माफ होतात आणि अल्लाह त्याला रहमत देतो, अशी श्रद्धा आहे.

# अंजनगाव बारीतील सौरऊर्जा प्रकल्पाचे काम रखडले

12 गावातील शेतकरी प्रतिक्षेत

प्रकल्प ठरला दिवास्वप्न

स्वस्त वीज मिळण्याची आस





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव बारी,( दि. 28 )-** शेतकर्यांना रास्त दरात वीज मिळावी, या उद्देशाने शासनाने सौर उर्जा प्रकल्पाला चालणा देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्याअंतर्गत अमरावती जिल्ह्यात अंजनगाव बारी येथे परिसरातील 12 गावांसाठी सौर उर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे. मात्र सहा वर्षापासून या प्रकल्पाच्या कामाला गतीच मिळालेली नाही. परिणामी हा सौर उर्जा प्रकल्प या गावांतील रहिवाशांसाठी दिवास्वप्नच ठरणार काय, असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

सहा वर्षापूर्वी अंजनगाव बारी ग्राम पंचायतकडून 10.5 हेक्टर क्षेत्र प्रकल्पासाठी देण्यात आले. पक्के कुंपण घालून प्रकल्पासाठी जागा बंदिस्त करण्यात आली. शासनाकडून 20.72 हेक्टर जागा या 5 मेगावॅट प्रकल्पासाठी उपलब्ध करण्यात आली. अंजनगाव बारी परिसरातील जमीन सुपिक असून सिंचनासाठी पाणीदेखील उपलब्ध आहे. मात्र परिमंडळात वीजपुरवठा अनियमित होत असल्याने अंजनगाव बारी ते पार्डी(देवी) रोडवरील अंजनगाव बारी हद्दीतील जमीन प्रकल्पासाठी देण्यात आली असून याचा लाभ परिसरातील 12 गावांना होणार आहे. या प्रकल्पातून शेतकर्यांना कमी दरात वीजपुरवठा तर मिळेलच, पण बागायतीसह सर्व हंगामातील पिकांना याचा लाभ होईल; मात्र प्रकल्पाचे काम रखडले आहे. काम का थांबले याबाबत महावितरणचे स्थानिक अधिकारी अनभिज्ञ आहे.

## या गावांना मिळणार लाभ

अंजनगाव बारीलगत असलेल्या पार्डी (देवी), अर्हाड - कुर्हाड, उदखेड, वडगाव जिरे, टिमटाळा, अडगाव (बु), मांजरी म्हसला, सावरगाव, खिरसाना-निरसाना, सावनेर, गोविंदपूर, भानखेडा या गावांना प्रकल्पाचा लाभ मिळेल. अंजनगाव बारी परिसरातील कृषी वीज पुरवठ्यातील अनियमीतता प्रकल्पामुळे दूर होउ शकेल. शेतकर्यांच्या दृष्टीने हा प्रकल्प पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. जिल्ह्यासाठी एकूण 10 प्रकल्प मंजूर झाले आहे. त्याचा निधीही शासनाकडे पडून आहे. त्यात या प्रकल्पाचाही समावेश आहे.

सौरऊर्जा प्रकल्पासाठी सोलर प्रकल्प अधिकार्यांनी जागेची मागणी केली होती. त्यानुसार अंजनगांव बारी ग्राम पंचायतने त्याकरिता जागा दिली. मात्र आता या प्रकल्पाचे काम का थांबले, हे कळायला मार्ग नाही.

**विनोद इसळ,**
**ग्रामविकास अधिकारी अंजनगांव बारी**

या सौरऊर्जा प्रकल्पापासून शेतकर्यांना कमी दरात वीज मिळेल. याचा लाभ बागायती पिके, रब्बी-खरीप मौसमात शेतकर्यांना होईल. हा प्रकल्प व्हावा म्हणून शेतकरी अपेक्षा करीत आहे. या प्रकल्पाचे काम का रखडले असा प्रश्न पडला आहे. प्रकल्प व्हावा म्हणून अनेक शेतकरी आजही प्रतिक्षा करीत आहे.

**जीवन हटवार,**
**युवा शेतकरी अंजनगांव बारी**

हा सौर ऊर्जा प्रकल्प 6 वर्षापासून रखडल्यामुळे 12 गावातील शेतकर्यांचा भ्रमनिरास झाला आहे. नांदगाव खंडेश्वर व चांदुर रेल्वे तालुक्यातील 12 ते 15 खेड्यांना या प्रकल्पाचा लाभ होणे अपेक्षित आहे. सध्या या गावात महावितरणकडून होत असलेल्या वीज पूरवठ्यात अनियमितता आहे. त्यामुळे शेतकरी त्रस्त असून पिकांचे नूकसान होत आहे. त्यामुळे हा प्रकल्प सुरू होणे अत्यावश्यक असुन त्वरीत सुरू न झाल्यास आम्ही शेतकरी किसान मोर्चाकडून आंदोलन करणार आहे.

**राजू वडनेरकर**
**जिल्हा महामंत्री, भाजप किसान मोर्चा**

## 24 तास विजपुरवठा

हा प्रकल्प महावितरणचे अधिकृत अंग असुन मेडाने प्रकल्पाचे ( नागपूर )काम हाती घेतले आहे. शेतकर्यांना या प्रकल्पातून कमी दराने 24 तास विजपुरवठा मिळेल, याचा लाभ आजूबाजूच्या 12 गावानां होणार आहे. मात्र कामच बंद असल्याने प्रकल्प उभारला जाण्याबाबत अनिश्चितता आहे.

# मोर्शी तालुक्यात तापमानाने गाठला उच्चांक

- कमाल 41 अंशांची नोंद
- उन्हामुळे नागरिक हैराण




**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.28 )-** मोर्शी तालुक्यात यंदा मार्च महिन्याच्या सुरूवातीपासूनच तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. दिवसेंदिवस तापमान वर जात आहे. मोर्शी तालुक्यात तापमानाने उच्चांक गाठला आहे. 41 अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद झाली आहे. उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या उन्हाचा पिकांवर परिणाम होण्याची संभावना आहे त्यामुळे शेतकर्यांना पिकांच्या संवर्धनासाठी अधिक काळजी घ्यावी लागणार आहे. उन्हाचा प्रभाव ग्रामीण भागातील लोकांच्या दैनंदिन जीवनावर दिसून येत आहे. स्थानिक हवामान खात्याने सांगितले की, पुढील काही दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. वाढत्या तापमानामुळे शहरातील रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. जलस्त्रोतांचा वापर वाढला असून, शेतकर्यांनी योग्य उपाययोजना केल्यास पिकांचे नुकसान टाळता येईल. तापमानात वाढ होत असल्याने आरोग्यविषयक धोके देखील निर्माण होऊ शकतात, असे मोर्शीच्या उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांनी सांगितले. उन्हात काळजी घेण्यासाठी, शक्य झाल्यास दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे, हलके आणि सुती कपडे घालावे आणि थंड पाण्याने आंघोळ करावी, तसेच उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास त्वरित वैद्यकीय मदत घेण्याचे आवाहन डॉ. प्रमोद पोतदार यांनी केले आहे.

# हल्दीरामचे एक्सपायर ताक विकणाऱ्या दुकानदारावर गुन्हा

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या आंदोलनाला यश ● पत्रकारांना झाली होती विषबाधा**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )-** हल्दीराम या नामांकित कंपनीचे एक्सपायरी डेट निघून गेलेले ताक विकणार्या सुगंध डेली नीडस अँड पान सेंटर या दुकानाच्या संचालकावर शहर कोतवाली पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे ताक पिल्याने काही पत्रकारांना विषबाधा झाली होती. त्यानंतर या प्रकरणात कारवाई करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वात तब्बल दोनदा जिल्हा कचेरीवर आंदोलने करण्यात आली. या आंदोलनाला अखेर यश प्राप्त झाले आहे.

सिटी कोतवाली पोलिसांनी हल्दीरामचे ताक पिल्यामुळे पत्रकारांना विषबाधा झाली का? याबाबतचा खुलासा मागितला होता. त्यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांनी पत्रकारांना हल्दीरामचे एक्सपायरी झालेले ताक पिल्यामुळे विषबाधा झाल्याचे पत्र दिले होते. त्यावरुन हे ताक विकणार्या सुगंधी डेली निड्स अँड पान सेंटरचे मालकावर भारतीय न्याय संहितेच्या कलम 125, 275 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे 11 मार्च 2025 रोजी हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांना हल्दीरामचे मॅन्युफॅक्चरिंग 7 एप्रिल 2024 तर 6 ऑक्टोबर 2024 एक्सपायरी डेट असलेले 7 महिन्यापूर्वीचे एक्सपायरी असलेले हल्दीराम यांचे झटका मटका मसाला ताक देण्यात आले होते.

हे ताक पिल्याने विनोद इंगळे, अर्चना रक्षे आणि सोमेश्वर जेवडे या तीन पत्रकारांना विषबाधा झाली होती. त्यामध्ये विनोद इंगळे व सोमेश्वर जेवढे या दोन पत्रकारांना जिल्हा सामान्य रुग्णालयात तब्बल चार दिवस उपचार घ्यावे लागले होते. तेव्हा हे ताक विकणार्या दुकानदारावर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सातत्याने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भाध्यक्ष नयन मोंढे यांनी पाठपुरावा केला आहे. जिल्ह्यात अश्या प्रकारे एक्सपायरी तारीख संपलेले शितपेय विकणारी अनेक दुकाने आहेत.

त्या सर्व दुकानाची तपासणी करून दोषी आढळणार्या दुकानदारांवर कारवाई करण्यात यावी. काही दुकानदार पैशांसाठी एक्सपायरी तारीख संपलेली उत्पादने विक्री करून नागरीकांच्या आरोग्याशी खेळत आहे. त्यामुळे गोरगरीब नागरीकांना आपला जिव गमवावा लागतो. या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने निषेध व निदर्शने आंदोलन केले होते. आंदोलनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भाध्यक्ष नयन मोंढे, शहराध्यक्ष विक्रम ढोके, विनोद इंगळे, सुधीर गणवीर, मनिष गुढधे, अर्चना रक्षे, सोमेश्वर जेवडे, संजय तायडे, नकुल नाईक, धनराज खर्चान, राजा वानखडे, नितीन मुळे, मिनाक्षी कोल्हे, उज्वल भालेकर, स्वप्निल सवाळे, संजय मोहोड यांनी सहभाग घेतला होता.



# तिवसा नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी प्रतिभा गौरखेडे

**अविरोध झाली निवडः माजी आमदार यशोमती ठाकूर यांचे वर्चस्व अबाधित**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )-** तिवसा नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी कॉंग्रेसच्या प्रतिभा वसंतराव गौरखेडे यांची अविरोध निवड करण्यात आली. नगराध्यक्षपदासाठी त्यांचाच एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची अविरोध निवड झाली. सभेच्या वेळी कॉंग्रेसचे 15 तर विरोधी गटातील चार सदस्य उपस्थित होते. विरोधकांकडून एकही अर्ज न आल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी पुन्हा एकदा आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. नगराध्यक्ष योगेश वानखडेयांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ही निवड्णूक घेण्यात आली.

पीठासीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी कामकाज पाहीजे. निवड प्रक्रिया सकाळी 11 वाजता सुरू झाली. नगरपंचायतीचे सर्व 19 सदस्य उपस्थित होते. यामध्ये कॉंग्रेसचे योगेश वानखडे, किसन मुंदाणे, अमर वानखडे, प्रिया विघ्ने, प्रिती भुरभुरे, संगीता राउत, मंगला वानखडे, नरेंद्र लांडगे, अर्चना भोंबे, माधुरी पुसाम, प्रतिभा भगत, सीमा खाकसे यांच्यासह स्वीकृत सदस्य सचिन गोरे, वैभव वानखडे आदी सदस्य उपसथित होते. तर विरोधी गटातील चार सदस्य उपस्थित होते. नगराध्यक्षांची हंगामी जबाबदारी सांभाळणा्या उपाध्यक्षा प्रिया विघ्ने यांनी अध्यक्षपदाचा पदभार नवनिर्वाचित अध्यक्षा प्रतिभा गौरखेडे यांच्याकडे सोपविला. यावेळी तहसीलदार आशीष नागरे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. प्रतिभा गौरखेडे यांच्या नावाची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी फटाके फोडून एकच जल्लोष साजरा केला. ॲड. यशोमतीताई ठाकूर यांच्या नेतृत्वात साजरा झालेल्या जल्लोषाच्यावेळी माजी सभाती दिलीप काळबांडे, तालुका कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष मुकुंदराव देशमुख, शहराध्यक्ष सेतु देशमुख, नितीन मेहकरे, नरेंद्र विघ्ने, गजानन भोंबे, दिवाकर भुरभुरे, उमेश राउत, प्रणव गौरखेडे,प्रमोद वानखडे यांच्यासह शेकडो कांग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# कुलरचा शॉक लागून महिलेचा मृत्यू

**अमरावती -** कुलरचा शॉक लागून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आष्टी गावात घडली. सविता विलास प्रधान (45, रा. आष्टी, वलगाव) असे मृतक महिलेचे नाव आहे. या घटनेच्या अनुषंगाने वलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे. सविता प्रधान यांना कुलरचा शॉक लागल्यानंतर, त्यांना कुटुंबीयांनी तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले. त्यावेळी डॉक्टरांच्या तपासणीत सविता यांना मृत घोषीत करण्यात आले. या घटनेची माहिती रुग्णालयातून वलगाव पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली.

# शाळांच्या परिक्षा भर उन्हातच, वेळापत्रकात बदल नाही

**आपत्ती व्यवस्थापनाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष | शिक्षण विभागाचा अजब कारभार**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 ) -** राज्यात सर्वत्र उन्हाचा पारा वाढत चाललाय. उन्हाची तीव्रता लक्षात घेता राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने निर्गमित केलेल्या परिपत्रकात विद्यार्थ्यांचे आरोग्य व वाढत्या तापमानापासून बचावाच्या दृष्टीने काही तरतुदी सुचविल्या आहेत. त्यानुसार इयत्ता पहिली ते नववीच्या परिक्षांच्या वेळापत्रकात आवश्यक बदल करुन विद्यार्थ्यांना उन्हाचा त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शिक्षण विभागाने मात्र त्याकडे दुर्लक्ष केले असून वेळापत्रकात बदल न करता रखरखत्या उन्हातच विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेण्याचा अट्टाहास लावला आहे. शिक्षण विभागाच्या या अजब कारभाराबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने शाळेत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना ताक, सरबत द्यावे, शाळा सकाळच्या सत्रात भरवावी, उष्माघातापासून बचावाच्या उपाययोजना कराव्या, अशा तरतुदी करण्याच्या सुचना केल्या आहेत. परंतू आपत्ती व्यवस्थापन समितीच्या या निर्देशानंतरही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे कडून इयत्ता 1 ली ते 9 वीच्या परिक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आलेला नाही. विद्यार्थ्यांना सरबत, ताक, ओआरएस पाजा, परंतू परिक्षा मात्र एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात तळपत्या उन्हातच घ्या, असा अट्टाहास राज्याच्या शिक्षण विभागाकडून केल्या जात असल्याचे दिसून येते.



एकीकडे उन्हाची तिव्रता लक्षात घेता, इयत्ता 10 वी व 12 वीच्या परिक्षा फेब्रुवारी, मार्च महिन्यात आटोपतात. परंतू दुसरीकडे प्राथमिक विद्यार्थ्यांच्या अगदी 1 ली, 2 री च्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा मात्र रखरखत्या उन्हात एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात घेणे, ही बाब शिक्षण विभागाची असंवेदनशीलता व निष्ठूरतेचे उदाहरण असल्याची टीका केली जात आहे. एप्रिल महिण्याच्या रखरखत्या उन्हात लहानग्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची परिक्षा घेवून विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचा शिक्षण विभागाचा हेतू काय आहे, हे मात्र कळायला मार्ग नाही. एप्रीलच्या शेवटच्या आठवड्यातील वाढते तापमान, शाळांमधील अपु-या भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांचे वय व आरोग्य या बाबी एससीईआरटीने परिक्षेचे वेळापत्रक ठरवताना लक्षात घ्यायला हव्या होत्या. आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून दिलेल्या सुचनांची दखल घेवून आता, तरी एससीईआरटीने शालेय परिक्षेच्या वेळापत्रकात बदल करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी केली आहे.



# श्री. गजानन कॉटन इंडस्ट्रीजला लागली आग

**लाखो रुपयांचा कापूस जळून खाक**

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.28 )-** दर्यापूर येथील सामदा मार्गावरील सूतगिरणी जवळ असलेल्या श्री. गजानन कॉटन इंडस्ट्रीजला दि. 27 मार्चला गुरुवारी सकाळच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत लाखों रुपयांचा कापूस जळून खाक झाला. यात अंदाजे सहा ते सात हजार क्विंटल (अंशी लाख रुपयांचा) कापूस जळाला अशी माहिती संचालक आशिष साबळे यांनी दिली. अग्निशमन साहाय्याने आगी वर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. सदर आग विद्युत शॉर्ट सर्किटमुळे लागली आहे, अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे.



